OK

# निर्देश पत्र

## मिरा - भाईंदर महानगरपालिका

**मुख्य कार्यालय** : स्व.इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प).
ता.जि. ठाणे ४०१ १०१. दुरध्वनी क्र. : २८१९२८२८ / २८१९३०८७

( सचिव विभाग)

क्रमांक :

तारीख :

| विषय | मा. स्थायी समिती<br>दि. ०२/०२/२०१०<br>प्रकरण-क्र- ११८ ते १३२ |
|---|---|

प्रकरण सुरु झाल्याची तारीख :

प्रकरण बंद केल्याची तारीख :

| दिनांक | कार्यवाही |
|---|---|

### अभिलेखाचे वर्गीकरण

| बाब क्रमांक | वर्ग | परिक्षणाचे वर्ष | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| | (अ / ब / क / त-१/ड) | | १ ते |

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

सुचना क्रं - १९
दि. २८/०१/२०१०

# मा. स्थायी समिती सभा.

## दि. ०२/०२/२०१०

प्रकरण क्रमांक :- ११८ ते १३२

(प्रकरण क्र. १३२ चे प्रस्ताव गोषवारा नाही.)

# <u>मिरा भाईंदर महानगरपालिका</u>

**मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)**

**नगरसचिव कार्यालय,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**दिनांक :- २९/०१/२०१०.**

## // <u>शुद्धीपत्रक</u> //

**प्रति,**
**सन्मा. श्री./श्रीमती** ______________________
नगरसेवक / नगरसेविका,
मिरा भाईंदर महानगरपालिका

महोदय / महोदया,

या शुद्धीपत्रकाद्वारे आपणांस कळविण्यांत येत आहे की, मा. स्थायी समिती सभा मंगळवार दि. ०२/०२/२०१० रोजी सकाळी ११.०० वाजता आयोजित करण्यात आलेली असून या सभेकरिता देण्यात आलेल्या विषयपत्रिकेऐवजी या शुध्दीपत्रकासोबत जोडलेल्या विषयपत्रिकेचे वाचन करण्यात यावे. हि विनंती.

कळावे.

**(हरेश फाटील)**
**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- २८/०१/२०१०.

## मा. स्थायी समिती सभा

**सभा सूचना क्र. :- १९, दिनांक २८/०१/२०१०**

**प्रति,**
**सन्मा. श्री./श्रीमती.** ______________________

स्थायी समिती सदस्य/सदस्या,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा मंगळवार दि. ०२/०२/२०१० रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, मुख्य कार्यालय, स्व. इंदिरा गांधी भवन, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. १९, दि. २८/०१/२०१० रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

(हरेश ल. पाटील)
**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. स्थायी समिती सभा सुचना क्रमांक १९, दि. २८/०१/२०१० सोबतची विषय पत्रिका**
**सभा मंगळवार दि. ०२/०२/२०१०**

| प्रकरण क्रमांक | विषय |
|---|---|
| --- | **मागील सभांचे इतिवृत्तांत – निरंक** |
| --- | **मध्यप्रश्न (इंटरप्रिलेशन्स)** - निरंक |
| --- | **विनंती अर्ज** - निरंक |
| --- | **परिवहन व विशेष समित्यांचे ठराव** - निरंक |
| --- | **आयुक्तांकडील पत्रे व कामकाज** - |
| ११८ | मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ८ नियम ७ नुसार मालमत्ता कराचे आकारणीसाठी करयोग्य मुल्य ठरविण्यासाठी भाडेमुल्याचे वाजवी दरास मंजूरी मिळणेबाबत. |
| ११९ | मालमत्ता कराच्या दरात वाढ करणेस मंजूरी मिळणेबाबत. |
| १२० | मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १४८क नुसार "रस्ता कर" लागू करणेस मंजूरी मिळणेबाबत. |
| १२१ | मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १२९(अअ) नुसार "पाणी पुरवठा लाभकर" लागू करणेस मंजूरी मिळणेबाबत. |
| १२२ | मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १२९(बब) नुसार "मलप्रवाह सुविधा लाभकर" लागू करणेबाबत. |
| १२३ | मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये सुधारणा करुन नंतर समाविष्ट केलेल्या कलम १४०ब नुसार परिस्थितीकीयदृष्ट्या लाभदायक योजनेची (पावसाचे पाणी साठविण्याची व्यवस्था, कृमी मिश्र खत, सौर उर्जेचा वापर आणि इतर अपारंपारिक उर्जा स्त्रोत, सांडपाण्याचे पुनश्चःचक्र आणि पुर्नवापर) अंमलबजावणी करण्याकरीता मालमत्ता करातून सूट किंवा परतावा देणेस मंजूरी मिळणेबाबत. |
| १२४ | शिक्षण उपकराच्या दरात वाढ करणेस मंजूरी मिळणेबाबत. |
| १२५ | पाणीपट्टी दरात व नविन जलजोडणी शुल्क व इतर दरात वाढ करणेबाबत. |
| १२६ | रस्ते, चौक, उद्याने व इतर वास्तुंना नावे देण्याबाबत. |
| १२७ | मिरा भाईंदर महानगरपालिका अग्निशमन दलाकरीता दोन मोठे टाटा १६१३/४८ चेसिसवर फायर टेंडर बॉडी बांधणेबाबत. |
| १२८ | कापडी फलक, बॅनर्स, कटाउट, होर्डींग्ज व कमानीच्या जाहिरात फी दरामध्ये वाढ करणेबाबत. |
| १२९ | केंद्र शासनाच्या जवाहरलाल नेहरु नॅशनल अर्बन रिन्युअल मिशन (JNNURM) अंतर्गत विशेष स्वच्छता कर वसूल करणेबाबत. |
| १३० | राज्य शासनाच्या धोरणानुसार दि. ०१/०४/२०१० रोजी पासून जकात कराऐवजी स्थानिक संस्था कर लागू करणेबाबत विचार विनिमय करणे. |
| १३१ | सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पात अग्निशमन करात दरवाढ करणेबाबत. |
| --- | **शासनाकडील किंवा शासकीय अधिकाऱ्यांकडील पत्रे** – निरंक |
| --- | **समित्यांचे किंवा उप समित्यांचे अहवाल** - निरंक |

**दिनांक :- २८/०१/२०१०.**

(हरेश ल. पाटील)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. स्थायी समिती सभा सुचना क्रमांक १९, दि. २८/०१/२०१० सोबतची विषय पत्रिका**
**सभा मंगळवार दि. ०२/०२/२०१०**

| प्रकरण क्रमांक | विषय |
|---|---|
| --- | **मागील सभांचे इतिवृत्तांत – निरंक** |
| --- | **मध्यप्रश्न (इंटरप्रिलेशन्स)** - निरंक |
| --- | **विनंती अर्ज** - निरंक |
| --- | **परिवहन व विशेष समित्यांचे ठराव** - निरंक |
| --- | **आयुक्तांकडील पत्रे व कामकाज** - |
| ११८ | पाणीपट्टी दरात व नविन जलजोडणी शुल्क व इतर दरात वाढ करणेबाबत. |
| ११९ | मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ८ नियम ७ नुसार मालमत्ता कराचे आकारणीसाठी करयोग्य मुल्य ठरविण्यासाठी भाडेमुल्याचे वाजवी दरास मंजूरी मिळणेबाबत. |
| १२० | मालमत्ता कराच्या दरात वाढ करणेस मंजूरी मिळणेबाबत. |
| १२१ | मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १४८क नुसार "रस्ता कर" लागू करणेस मंजूरी मिळणेबाबत. |
| १२२ | मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १२९(अअ) नुसार "पाणी पुरवठा लाभकर" लागू करणेस मंजूरी मिळणेबाबत. |
| १२३ | मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १२९(बब) नुसार "मलप्रवाह सुविधा लाभकर" लागू करणेबाबत. |
| १२४ | मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये सुधारणा करुन नंतर समाविष्ट केलेल्या कलम १४०ब नुसार परिस्थितीकीयदृष्ट्या लाभदायक योजनेची (पावसाचे पाणी साठविण्याची व्यवस्था, कृमी मिश्र खत, सौर उर्जेचा वापर आणि इतर अपारंपारिक उर्जा स्त्रोत, सांडपाण्याचे पुनश्चःचक्र आणि पुर्नवापर) अंमलबजावणी करण्याकरीता मालमत्ता करातून सूट किंवा परतावा देणेस मंजूरी मिळणेबाबत. |
| १२५ | शिक्षण उपकराच्या दरात वाढ करणेस मंजूरी मिळणेबाबत. |
| १२६ | रस्ते, चौक, उद्याने व इतर वास्तुंना नावे देण्याबाबत. |
| १२७ | मिरा भाईंदर महानगरपालिका अग्निशमन दलाकरीता दोन मोठे टाटा १६१३/४८ चेसिसवर फायर टेंडर बॉडी बांधणेबाबत. |
| १२८ | कापडी फलक, बॅनर्स, कटाउट, होर्डीग्ज व कमानीच्या जाहिरात फी दरामध्ये वाढ करणेबाबत. |
| १२९ | केंद्र शासनाच्या जवाहरलाल नेहरु नॅशनल अर्बन रिन्युअल मिशन (JNNURM) अंतर्गत विशेष स्वच्छता कर वसूल करणेबाबत. |
| १३० | राज्य शासनाच्या धोरणानुसार दि. ०१/०४/२०१० रोजी पासून जकात कराऐवजी स्थानिक संस्था कर लागू करणेबाबत विचार विनिमय करणे. |
| --- | **शासनाकडील किंवा शासकीय अधिकाऱ्यांकडील पत्रे** – निरंक |
| --- | **समित्यांचे किंवा उप समित्यांचे अहवाल** - निरंक |

**दिनांक :- २८/०१/२०१०.**

**(हरेश ल. पाटील)**
**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

५

# मिरा-भाईदर महानगरपालिका



## मा. स्थायी समिती सभा दि. ०२/०२/२०१०

## ।। गोषवारा ।।

**प्रकरण क्र. ११८ :- मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ८ नियम ७ नुसार मालमत्ता कराचे आकारणीसाठी करयोग्य मुल्य ठरविण्यासाठी भाडे मुल्याचे वाजवी दरास मंजूरी मिळणे बाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका मुंबई महानगरपालिका क्षेत्राच्या नजीक असून मिरा भाईंदर शहर रेल्वे व बसेसव्दारे मुंबई शहराशी जोडले आहे. शहरामध्ये मोठया प्रमाणावर मुंबई शहरातुन लोक सदनिका/घरे खरेदी करुन स्थलांतरीत होत असतात. शहराचा मोठया प्रमाणावर विकास होत असल्याकारणाने शहरातील जागा, फ्लॅट, दुकाने यांचे बाजारभावात देखील त्या प्रमाणात मोठी वाढ झालेली आहे. शहरामध्ये औद्योगीक गाळे, रहीवासी सदनिका यांचे भाडयाचे दर देखील वाढलेले आहेत. महानगरपालिका हद्दीतील सदनिका/दुकाने/घरे यांचे ठरविण्यांत आलेले दर हे सन १९९८ साली मुल्य निर्धारण अधिकारी, नगररचना ठाणे यांनी ठरविलेले आहेत. त्यावेळी शहरतील सदनिकांचे दर रु. ६००/- ते रु. ७००/- या दरम्यान होते तेच दर आज रु. २५००/- ते रु. ४०००/- एवढया प्रमाणात झालेले असून महानगरपालिकेने विशेषत: रहीवासी सदनिका/घरे इ. मालमत्तेवर कर आकारणीसाठी १० वर्षापूर्वी जे भाडयाचे दर ठरविलेले आहेत, त्याच दराने अद्यापही करपात्र मूल्य ठरवून कर आकारणी केली जाते.

मिरा भाईंदर महानगरपालिकेने जवाहरलाल नेहरु नॅशनल अर्बन रिनीवल मिशन (JNNURM) अंतर्गत मोठया प्रमाणावर वेगवेगळे शहर विकासाचे प्रकल्प हाती घेतलेले आहेत. सदरहु सर्व प्रकल्पाचा खर्च अंदाजे १९०० कोटी इतका आहे. या खर्चापैकी ५०% रक्कम शासन व उर्वरीत ५०% रक्कम महानगरपालिकेने उभी करावयाची आहे. एवढया मोठया प्रमाणावर लागणारा निधी उपलब्ध करण्याच्या दृष्टीने महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविणे आवश्यक आहे. महानगरपालिकेने द्यावयाची रक्कम एम.एम.आर.डी.ए., विविध शासकिय वित्त संस्थांकडुन कर्जरुपाने घेण्याचे प्रस्तावित आहे. केंद्र शासन व राज्य शासन यांच्या बरोबर जवाहरलाल नेहरु नॅशनल अर्बन रिनीवल मिशन (JNNURM) प्रकल्प संदर्भात केलेल्या एम.ओ.यु. मध्ये कर्ज परतफेडीसाठी लागणारा निधी महानगरपालिका विविध कर व दरामध्ये वाढ करुन पैसा उपलब्ध करेल अशी हमी महानगरपालिकेने दिलेली आहे. महानगरपालिकेने लेखी दिलेल्या हमीनुसार कर्ज मंजूरीच्या प्रस्तावावर कार्यवाही शासनाकडे चालू आहे. महानगरपालिकेने लेखी दिलेल्या हमीपत्रा नुसार महानगरपालिकेचे कर व दर वाढवुन उत्पन्न वाढविणे महानगरपालिकेवर बंधनकारक झालेले आहे.

मिरा भाईंदर शहरामध्ये मोठया प्रमाणावर गृह संकुले उभी राहत असून वाढत्या गृह संकुलनामध्ये परिसरात रस्ते, गटारे, दिवाबत्ती, पाणी पुरवठा आदी सुविधा महानगरपालिकेला द्याव्या लागतात. महानगरपालिकेचे मर्यादीत उत्पन्न त्या तुलनेत होणारा वाढता खर्च, कर्जाची परतफेड व बांधील खर्च विचारात घेता सध्याच्या उत्पन्नामधुन महानगरपालिकेला आर्थिकदृष्टया कारभार संभाळणे अडचणीचे झालेले आहे. महानगरपालिकेच्या उत्पन्नाचे स्त्रोत वाढविणे अत्यावश्यक आहे

महानगरपालिका नविन कर आकारणीसाठी जे भाडेमूल्याचे दर आहेत, त्यामध्ये वाढ केल्यास महानगरपालिकेच्या उत्पन्नामध्ये वाढ होउ शकेल (सोबत सध्याचे व प्रस्तावित भाडेमूल्याचा दर तक्ता जोडला आहे.)

प्रस्तावित भाडेमूल्याच्या दरास मान्यतेस शिफारस असे.

**मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने**

उप-आयुक्त (मु.)
मिरा-भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## कर आकारणीसाठी वार्षिक भाडे मूल्याचे या पूर्वीचे (मा. महासभा ठराव क्र. ४३ दि. २१/०८/२००६ व ठराव क्र. २७ दि. २०/०२/२००८ नुसार) मंजूर केलेले दर व प्रस्तावित दर तक्ता

| अ. क्र. | विभागाचे नांव | इमारतीचा प्रकार | प्रती चौरस फूट प्रती महिना | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | पूर्वीचा दर | | नविन प्रस्तावित दर | |
| | | | रहिवास वापरासाठी | बिगर रहिवासी वापरासाठी | रहिवास वापरासाठी | बिगर रहिवासी वापरासाठी |
| १ | २ | ३ | ४ | ५ | | |
| १ | मिरारोड (पुर्व) भाईंदर (पुर्व-पश्चिम) | अ- आर सी सी | रु. १.६० | रु. ३.०० | रु. २.०० | रु. ५.०० |
| | | ब- लोड बेअरींग सिमेंट शिट्स व कौलारु | रु. १.४० | रु. २.५० | रु. १.६० | रु. ४.०० |
| | | क- माती वीटा कौलारु लाकडी पाटयाच्या भिंती | रु. ०.७० | रु. १.५० | रु. ०.७० | रु. १.५० |
| | | ड- भिंती, झोपडी, कुडाच्या भिंती | रु. ०.४० | -- | रु. ०.४० | -- |
| २ | घोडबंदर काशिमिरा, मिरा, पेणकरपाडा, चेणे वर्सोवा सर्व महामार्गा लगत | अ- आर सी सी | रु. १.६० | रु. ३.०० | रु. २.०० | रु. ५.०० |
| | | ब- लोड बेअरींग सिमेंट शिट्स व कौलारु | रु. १.२० | रु. २.०० | रु. १.४० | रु. ३.५० |
| | | क- माती वीटा कौलारु लाकडी पाटयाच्या भिंती | रु. ०.५५ | रु. १.०० | रु. ०.५५ | रु. १.०० |
| | | ड- भिंती, झोपडी, कुडाच्या भिंती | रु. ०.३५ | -- | रु. ०.३५ | -- |
| ३ | घोडबंदर काशिमिरा, मिरा,महाजन पेणकरपाडा, चेणे वर्सोवा सर्व गावठाण | अ- आर सी सी | रु. १.४० | रु. २.८० | रु. १.८० | रु. ४.५० |
| | | ब- लोड बेअरींग सिमेंट शिट्स व कौलारु | रु. १.२० | रु. २.४० | रु. १.४० | रु. ३.५० |
| | | क- माती वीटा कौलारु लाकडी पाटयाच्या भिंती | रु. ०.५५ | रु. १.०० | रु. ०.५५ | रु. १.२० |
| | | ड- भिंती, झोपडी, कुडाच्या भिंती | रु. ०.३५ | -- | रु. ०.३५ | -- |
| ४ | उत्तन | अ- आर सी सी | रु. ०.८५ | रु. १.५० | रु. १.५० | रु. ४.०० |
| | | ब- लोड बेअरींग सिमेंट शिट्स व कौलारु | रु. ०.६५ | रु. १.२० | रु. ०.८० | रु. २.५० |
| | | क- माती वीटा कौलारु लाकडी पाटयाच्या भिंती | रु. ०.५५ | रु. ०.८० | रु. ०.५५ | रु. ०.८० |
| | | ड- भिंती, झोपडी, कुडाच्या भिंती | रु. ०.३२ | -- | रु. ०.३२ | -- |
| ५ | राई मुर्धे, डोंगरी चौकी, मोरवा | अ- आर सी सी | रु. ०.८५ | रु. १.५० | रु. १.५० | रु. ४.०० |
| | | ब- लोड बेअरींग सिमेंट शिट्स व कौलारु | रु. ०.६५ | रु. १.२० | रु. ०.८० | रु. २.५० |
| | | क- माती वीटा कौलारु लाकडी पाटयाच्या भिंती | रु. ०.५५ | रु. ०.८० | रु. ०.५५ | रु. ०.८० |
| | | ड- भिंती, झोपडी, कुडाच्या भिंती | रु. ०.३२ | -- | रु. ०.३२ | -- |
| ६ | काजूपाडा, चेणे वर्सोवा, माशाचा पाडा, काशी, मिरा-गावठण, महाजन वाडी, घोडबंदर, आदिवासी पाडयामधील आदीवासी कुटुंबे. | क- माती वीटा कौलारु लाकडी पाटयाच्या भिंती | रु. ०.०५ | -- | रु. ०.०५ | -- |
| | | ड- भिंती, झोपडी, कुडाच्या भिंती | रु. ०.०५ | -- | रु. ०.०५ | -- |

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि. २/२/२०१०

## ।। गोषवारा।।

**प्रकरण क्र.१२० :- मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १४८ क नुसार "रस्ता कर" लागू करणेस मंजूरी मिळणे बाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिकेने जवाहरलाल नेहरु नॅशनल अर्बन रिनीवल मिशन (JNNURM) अंतर्गत रु. १९०० कोटीचे प्रकल्प सादर केलेले आहेत. त्यामध्ये ५०% शासन व उर्वरीत ५०% रक्कम महानगरपालिकेस उभी करावी लागणार आहे. जवाहरलाल नेहरु नॅशनल अर्बन रिनीवल मिशन (JNNURM) अंतर्गत एम. ओ. यु. मध्ये उत्पन्नाचे स्त्रोत वाढविण्याची हमी महानगरपालिकेने दिलेली आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये कलम १४८क नुसार रस्ता कर लावण्याची तरतुद असून तरतुदी नुसार "रस्ता कर" १०% पर्यत लागू करण्याचा अधिकार महानगरपालिकेस आहे. उक्त तरतुदीनुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेने रस्ता कर लागू केला नाही, हया बाबत लेखा परीक्षक यांनी आक्षेप नोंदविलेला आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेने नविन रस्ते बनविणे, रस्ते दुरुस्ती देखभाल व डी.पी. रोड तयार करणेकामी मागील तीन वर्षात खालीलप्रमाणे खर्च केलेला आहे.

(आकडे लाखात)

| | सन २००६-०७ | सन २००७-०८ | सन २००८-०९ |
|---|---|---|---|
| नविन रस्ते बांधकाम | ६२९.५४ | ५१२.०९ | ५२०.८८ |
| रस्ते दुरुस्ती | ६०२.८८ | ६६५.७४ | ८५४.०९ |
| डी. पी. रोड बांधकाम | ७४५.३३ | २६१.३८ | १८४७.३० |

उक्त खर्च पाहता मोठया प्रमाणात निधीची आवश्यकता असते. त्यातच १ एप्रिल २०१० पासून महानगरपालिकेच्या उत्पन्नाचे मुख्य स्त्रोत असलेला "जकात कर" रद्द करुन त्याऐवजी "स्थानिक संस्था कर" लागू करणेचे निर्देश राज्य शासनाचे महानगरपालिकेस दिलेले आहेत. "जकात कर" बंद करुन "उपकर" लागू केल्याबाबतच्या १ सप्टेंबर २००८ ते १८ डीसेंबर २००८ य कालावधीतील अनुभव पाहता जकातीच्या ५०% एवढेच उत्पन्न महानगरपालिकेस मिळालेले आहे. अशा परिस्थीतीत "जकात कर" बंद करुन "स्थानिक संस्था" कर लागू केल्यानंतर महानगरपालिकेच्या उत्पन्नात घट येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

जकात कर बंद केल्याने होणारी उत्पन्नातील घट, जवाहरलाल नेहरु नॅशनल अर्बन रिनीवल मिशन (JNNURM) अंतर्गत प्रकल्पासाठी घ्यावयाच्या कर्जाची परतफेड, नविन रस्ते, डी. पी. रोड,

| करयोग्य मूल्य | सध्याचा कराचा दर | प्रस्तावित सुधारित दर | मिळणारे अंदाजित उत्पन्न (वाढीव) |
|---|---|---|---|
| १ ते १२००० | २८% | ३०% | २.१९ कोटी |
| १२००१ ते ३०००० | २८% | ३२% | ०.३४ कोटी |
| ३०००१ ते ५०००० | २८% | ३५% | ०.१३ कोटी |
| ५०००१ पेक्षा जास्त | २८% | ३८% | १.९८ कोटी |
| एकुण | | | ४.६४ कोटी |

वरील प्रमाणे करयोग्य मूल्यावर दरवाढ केल्यास महानगरपालिकेस अंदाजे रु. ४.६४ कोटी इतकी वाढीव उत्पन्न मिळे शकेल तरी मालमत्ता कराच्या (घरपट्टी) दरात वाढ करणे मान्यतेस शिफारस असे.

मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने

उप-आयुक्त (मु.)
मिरा-भाईंदर महानगरपालिका

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ७ | मोठमोठी हॉटेल्स, रिसॉर्ट, सिनेमागृह मॉल्स, शॉपींग सेंटर इ. (फक्त वाणिज्य वापराकरिता असलेले) | अ- आर सी सी | -- | रु. ५.०० | -- | रु. ७.०० |
| ८ | हॉटेलसह लॉजिंग बोर्डींग, सार्व. हॉल, मंगल कार्यालये. | अ- आर सी सी<br>ब- लोड बेअरींग सिमेंट शिट्स व कौलारु | --<br>-- | रु. ५.००<br>रु. ४.०० | --<br>-- | रु. ७.००<br>रु. ५.०० |
| ९ | हॉटेल, सार्व. हॉल, मंगल कार्यालय लगतच्या लॉन्स, मोकळया जागा व अन्य व्यावसायिक वापर करणाऱ्या मोकळया जागा. | | -- | रु. १.०० | -- | रु. २.०० |

७

# मिरा-भाईदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि.२ / २ /२०१०

## ।। गोषवारा ।।

**प्रकरण क्र. ११८ :- मालमत्ता कराच्या (घरपट्टी) दरात वाढ करणेस मंजूरी मिळणे बाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिकेने जवाहरलाल नेहरु नॅशनल अर्बन रिनीवल मिशन (JNNURM) अंतर्गत रु. १९०० कोटीचे प्रकल्प सादर केलेले आहेत. त्यामध्ये ५०% शासन व उर्वरीत ५०% रक्कम महानगरपालिकेस उभी करावी लागणार आहे. जवाहरलाल नेहरु नॅशनल अर्बन रिनीवल मिशन (JNNURM) अंतर्गत एम. ओ. यु. मध्ये उत्पन्नाचे स्त्रोत वाढविण्याची हमी महानगरपालिकेने दिलेली आहे. जवाहरलाल नेहरु नॅशनल अर्बन रिनीवल मिशन (JNNURM) अंतर्गत प्रकल्पासाठी महानगरपालिकेच्या हिताच्या निधी एम. एम. आर. डी. ए., विविध शासकिय वित्त संस्थांकडुन कर्जरुपाने घेण्याचे प्रस्तावित आहे. यासंदर्भात महानगरपालिकेने शासनाशी केलेल्या एम. ओ. यु. मध्ये कर्ज फेडण्यासाठी लागणारा निधी महानगरपालिका विविध कर व दरामध्ये वाढ करुन उपलब्ध करण्याची हमी दिलेली आहे. महानगरपालिकेने दिलेल्या हमीनुसार कर्ज मंजूरीच्या प्रस्तावावर शासनाकडे कार्यवाही चालू आहे. महानगरपालिकेने उत्पन्न वाढीसाठी महानगरपालिकचे कर व दर वाढविणे आवश्यक आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे मालमत्ता कर हे उत्पन्नाचे प्रमुख स्त्रोत आहे. मालमत्ता कराचा दर सन २००२-०३ पर्यत २५% होता, तो २००३-०४ पासून २८% केलेला असून अद्यापपर्यत तोच दर कायम आहे. सध्या मालमत्ता कराचे २८% प्रमाणे प्रतिवर्षी रक्कम रु. ३७.०० कोटी इतके उत्पन्न मिळत आहे. परंतु जवाहरलाल नेहरु नॅशनल अर्बन रिनीवल मिशन (JNNURM) या प्रकल्पाचा खर्च, त्यासाठी घ्यावी लागणारी कर्जे व त्याच्या परतफेडीसठी लागणारा निधी विचारात घेता हे उत्पन्न अपुरे पडणार आहे. तसेच १ एप्रिल २०१० पासून "जकात कर" बंद करुन "स्थानिक संस्था" कर लागू केल्यास जकाती पासून मिळणारे उत्पन्न एवढे मिळेलच असे नाही.

वरील प्रमाणे विविध प्रकल्पांना लागणारा निधी, कर्ज परतफेडीसठी लागणारा निधी, जकात बंद झाल्यानंतर उत्पन्नात होणारी घट विचारात घेता मालमत्ता कराच्या दरामध्ये वाढ करणे आवश्यक आहे. सध्या असलेल्या मालमत्ता कराच्या दरामध्ये खालीलप्रमाणे वाढ सुचविण्यांत येत आहे.

(२)

रस्ते दुरुस्ती यावर होणारा खर्च आदी विचारात घेता महानगरपालिकेच्या उत्पन्नाचे स्त्रोत वाढविणे अत्यावश्यक आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १४८क मध्ये "रस्ता कर" लागू करण्याची तरतुद असून १०% पर्यत लागू करण्याचा अधिकार महानगरपालिकेस आहे. तरी उक्त तरतुदीनुसार १०% रस्ता कर लागू केल्यास या कराच्या रुपाने महानगरपालिकेस अंदाजे रु. १३.०० कोटी इतके वाढीव उत्पन्न मिळू शकेल. तरी वरीलप्रमाणे "रस्ता कर" लागू करणेस मान्यतेरा शिफारस असे.

**मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने**

उप-आयुक्त (मु.)
**मिरा-भाईदर महानगरपालिका**

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि. २/२/२०१०

## ।। गोषवारा ।।

**प्रकरण क्र. १२९ :- मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १२९(अअ) नुसार "पाणीपुरवठा लाभ कर" लागू करणेस मंजूरी मिळणे बाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिकेने जवाहरलाल नेहरु नॅशनल अर्बन रिनीवल मिशन (JNNURM) अंतर्गत रु. १९०० कोटीचे प्रकल्प सादर केलेले आहेत. त्यामध्ये ५०% शासन व उर्वरीत ५०% रक्कम महानगरपालिकेस उभी करावी लागणार आहे. जवाहरलाल नेहरु नॅशनल अर्बन रिनीवल मिशन (JNNURM) अंतर्गत एम. ओ. यु. मध्ये उत्पन्नाचे स्त्रोत वाढविण्याची हमी महानगरपालिकेने दिलेली आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये कलम १२९(अअ) नुसार पाणी पुरवठा लाभ कर लावण्याची तरतुद असून तरतुदीनुसार "पाणीपुरवठा लाभ कर" लागू करण्याचा अधिकार महानगरपालिकेस आहे. उक्त तरतुदीनुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेने पाणीपुरवठा लाभ कर लागू केला नाही, हया बाबत लेखा परीक्षक यांनी आक्षेप नोंदविलेला आहे.

दिनांक १ एप्रिल २०१० पासून महानगरपालिकेच्या उत्पन्नाचे मुख्य स्त्रोत असलेला "जकात कर" रद्द करुन त्याऐवजी "स्थानिक संस्था कर" लागू करणेचे निर्देश राज्य शासनाचे महानगरपालिकेस दिलेले आहेत. "जकात कर" बंद करुन "उपकर" लागू केल्याबाबतच्या १ सप्टेंबर २००८ ते १८ डीसेंबर २००८ य कालावधीतील अनुभव पाहता जकातीच्या ५०% एवढेच उत्पन्न महानगरपालिकेस मिळालेले आहे. अशा परिस्थीतीत "जकात कर" बंद करुन "स्थानिक संस्था" कर लागू केल्यानंतर महानगरपालिकेच्या उत्पन्नात घट येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

जकात कर बंद केल्याने होणारी उत्पन्नातील घट, जवाहरलाल नेहरु नॅशनल अर्बन रिनीवल मिशन (JNNURM) अंतर्गत प्रकल्पासाठी घ्यावयाच्या कर्जाची परतफेड, भुयारी गटार योजनेवर होणारा खर्च, गटारे बांधणेकामी होणारी खर्च आदी विचारात घेता महानगरपालिकेच्या उत्पन्नाचे स्त्रोत वाढविणे अत्यावश्यक आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १२९(अअ) मध्ये "पाणीपुरवठा लाभ कर" लागू करण्याची तरतुद असून हा कर लागू करण्याचा अधिकार महानगरपालिकेस आहे. तरी उक्त तरतुदीनुसार १०% पाणीपुरवठा कर लागू केल्यास या कराच्या रुपाने महानगरपालिकेस अंदाजे रु. १३.०० कोटी इतके वाढीव उत्पन्न मिळू शकेल. तरी वरीलप्रमाणे "पाणीपुरवठा लाभ कर" लागू करणेस मान्यतेस शिफारस असे.

**मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने**

उप-आयुक्त (मु.)
मिरा-भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि. २/२/२०१०

## ।। गोषवारा ।।

**प्रकरण क्र. १२२ :- मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १२९(बब) नुसार "मलप्रवाह सुविधा लाभ कर" लागू करणेस मंजूरी मिळणे बाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिकेने जवाहरलाल नेहरु नॅशनल अर्बन रिनीवल मिशन (JNNURM) अंतर्गत रु. १९०० कोटीचे प्रकल्प सादर केलेले आहेत. त्यामध्ये ५०% शासन व उर्वरीत ५०% रक्कम महानगरपालिकेस उभी करावी लागणार आहे. जवाहरलाल नेहरु नॅशनल अर्बन रिनीवल मिशन (JNNURM) अंतर्गत एम. ओ. यु. मध्ये उत्पन्नाचे स्त्रोत वाढविण्याची हमी महानगरपालिकेने दिलेली आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये कलम १२९(बब) नुसार पाणी पुरवठा लाभ कर लावण्याची तरतुद असून तरतुदीनुसार "मलप्रवाह सुविधा लाभ कर" लागू करण्याचा अधिकार महानगरपालिकेस आहे. उक्त तरतुदीनुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेने मलप्रवाह सुविधा लाभ कर लागू केला नाही, हया बाबत लेखा परीक्षक यांनी आक्षेप नोंदविलेला आहे.

दिनांक १ एप्रिल २०१० पासून महानगरपालिकेच्या उत्पन्नाचे मुख्य स्त्रोत असलेला "जकात कर" रद्द करुन त्याऐवजी "स्थानिक संस्था कर" लागू करणेचे निर्देश राज्य शासनाचे महानगरपालिकेस दिलेले आहेत. "जकात कर" बंद करुन "उपकर" लागू केल्याबाबतच्या १ सप्टेंबर २००८ ते १८ डीसेंबर २००८ य कालावधीतील अनुभव पाहता जकातीच्या ५०% एवढेच उत्पन्न महानगरपालिकेस मिळालेले आहे. अशा परिस्थीतीत "जकात कर" बंद करुन "स्थानिक संस्था" कर लागू केल्यानंतर महानगरपालिकेच्या उत्पन्नात घट येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

जकात कर बंद केल्याने होणारी उत्पन्नातील घट, जवाहरलाल नेहरु नॅशनल अर्बन रिनीवल मिशन (JNNURM) अंतर्गत प्रकल्पासाठी घ्यावयाच्या कर्जाची परतफेड, भुयारी गटार योजनेवर होणारा खर्च, गटारे बांधणेकामी होणारी खर्च आदी विचारात घेता महानगरपालिकेच्या उत्पन्नाचे स्त्रोत वाढविणे अत्यावश्यक आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १२९(बब) मध्ये "मलप्रवाह सुविधा लाभ कर" लागू करण्याची तरतुद असून हा कर लागू करण्याचा अधिकार महानगरपालिकेस आहे. तरी उक्त तरतुदीनुसार १०% मलप्रवाह कर लागू केल्यास या कराच्या रुपाने महानगरपालिकेस अंदाजे रु. १३.०० कोटी इतके वाढीव उत्पन्न मिळू शकेल. तरी वरीलप्रमाणे "मलप्रवाह सुविधा लाभ कर" लागू करणेस मान्यतेस शिफारस असे.

**मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने**

उप-आयुक्त (मु.)
मिरा-भाईदर महानगरपालिका

# मिरा-भाईदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि. २ / २ /२०१०

## ।। गोषवारा।।

**प्रकरण क्र. 123 :- मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये सुधारणा करुन नंतर समाविष्ट केलेल्या कलम १४०ब नुसार परिस्थितीकीय दृष्टया लाभदायक योजनेची (पावसाचे पाणी साठविण्याची व्यवस्था, कृमी मिश्र खत, सौर उर्जेचा वापर आणि इतर अपारंपारिक उर्जास्त्रोत, सांडपाण्याचे पुनश्च:चक्रण आणि पुर्नवापर किंवा पर्यावरणनुकुल) अंमलबजावणी करण्याकरीता मालमत्ता करातून सुट किंवा परतावा देणेस मंजूरी मिळणे बाबत.**

महानगरपालिका क्षेत्रातील ज्या इमारतीच्या बाबतीत पावसाचे पाणी साठविण्याची व्यवस्था, कृमी मिश्र खत, सौर उर्जेचा वापर आणि इतर पारंपारिक उर्जास्त्रोत, सांडपाण्याचे पुनश्च:चक्रण आणि पुर्नवापर किंवा पर्यावरणनुकुल आणि परिस्थितीकीय लाभदायक गृहनिर्माण संस्था यांना चालना देणारी किंवा महानगरपालिका किंवा राज्य शासन यांनी निश्चित केलेली या सारख्या कोणत्याही योजनेची अंमलबजावणी करण्यांत येत असेल अशा इमारतीच्या बाबतीत मालमत्ता करातून सुट किंवा परतावा देण्याबाबत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमात सुधारणा करुन पुढील प्रमाणे कलम समाविष्ट केलेले आहे.

**कलम १४०ब.** या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी या कलमाच्या प्रयोजनार्थ राज्य शासन किंवा महानगरपालिका ठरवून देईल अशी परिस्थिकीयदृष्टया लाभदायक योजनेची अंमलबजावणी करण्यांत येत असेल अशा जमिनीच्या आणि इमारतींच्या बाबतीत महानगरपालिका, सर्वसाधारण वा विशेष आदेशाव्दारे, निर्धारीत करील अशा दराने मालमत्ता कर भरण्यातून सुट किंवा परतावा देईल आणि परिस्थितीकीयदृष्टया लाभदायक योजनेची अंमलबजावणी करण्याकरीता आणि ती चालू ठेवण्याकरीता उपाययोजनांची मर्यादा लक्षात घेउन, सुट किंवा परतावा देण्याचे वेगवेगळे दर निर्धारीत करता येतील.

उपरोक्त तरतुद करुन सदरचा अधिनियम १४ जानेवारी २००९ च्या राजपत्रात प्रसिध्द केलेला आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये नव्याने निर्माण होणाऱ्या गृह संकुलनामध्ये पावसाचे पाणी साठविण्याची व्यवस्था (रेन वॉटर हार्वेस्टिंग), सौर उर्जेचा वापर (सोलर वॉटर हिटर), सांडपाण्याचे पुनश्च:चक्रण आणि वापर (सिवरेज ट्रीटमेंट प्लांट) आदी योजनांची अंमलबजावणी केली जात आहे.

वरीलप्रमाणे योजनांची अंमलबजावणी ही पर्यावरणानुकुल असल्याने पर्यावरणाचे तसेच मूलभुत सुविधा स्त्रोतांचे रक्षण होण्यास मदत होत आहे. अशा योजनांच्या अंमलबजावणीसाठी मोठया प्रमाणात भांडवली खर्च तसेच त्यांच्या देखभाल दुरुस्तीसाठी गृहनिर्माण संस्थांना खर्च करावा लागत असतो. पर्यावरणनुकुल व परिस्थितीकीय लाभदायक गृहनिर्माणास योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी

होणारा खर्च पाहता अशा गृहनिर्माण वा सोसायटयांना मालमत्ता करात सुट किंवा परतावा देणे संयुक्तीक आहे.

तसेच अशा वेगवगळया योजनांसाठी वेगवेगळया दराने सुट किंवा परतावा देण्याची तरतुद उक्त कलमामध्ये करण्यांत आलेली आहे. तरी खालीलप्रमाणे सुट देण्यांसाठी दर निश्चित करणे योग्य होईल.

| अ.क्र. | योजना | मालमत्ता करात सुट देण्याचा दर |
|---|---|---|
| १ | पावसाचे पाणी साठविण्याची व्यवस्था (रेन वॉटर हार्वेस्टिंग) | ५% |
| २ | सौर उर्जेचा वापर आणि इतर पारंपारिक उर्जास्त्रोत (सोलर वॉटर हिटर) | ५% |
| ३ | सांडपाण्याचे पुनश्च:चक्रण आणि पुर्नवापर (सिवरेज ट्रीटमेंट प्लांट) | १०% |

तसेच मालमत्ता करात सुट देण्यासाठी खालील निकषही ठरविणे आवश्यक आहे.

तसेच मालमत्ता करात सुट देण्यासाठी खालील निकषही ठरविणे आवश्यक आहे.

१) मालमत्ता करात सुट मिळविणेसाठी प्रतिवर्षी १ एप्रिल ते १५ एप्रिल या दरम्यान संबधित गृहनिर्माण सोसायटीने महानगरपालिकेकडे अर्ज करावा लागेल.

२) अर्जासोबत उक्त योजनांची अंमलबजावणी करुन त्या चालू असल्याबाबत महानगरपालिकेच्या संबधित विभागाचे (पाणी पुरवठा/ सार्व. बांधकाम) प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

तरी वरील निकषावर उक्त लाभदायक योजनांची अमंलबजावणी करणाऱ्या मालमत्तांना करामध्ये सुट देणेस मंजूरी मिळणेस शिफारस असे.

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि. २/२/२०१०

## ।। गोषवारा।।

**प्रकरण क्र. १२४ :- मनपा शिक्षण कराच्या (विशेष शिक्षण कर) दरात वाढ करणेस मंजूरी मिळणे बाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण मंडळ संचालित एकुण ३४ शाळा (विविध माध्यम) असून त्यातुन ९८७१ गोरगरीब विद्यार्थ्यांना महानगरपालिकेतर्फे मोफत शिक्षण दिले जाते. त्याच बरोबर विद्यार्थ्यांना गणवेश, प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका, शालेय क्रिडा स्पर्धा, संगणक प्रशिक्षण, सांस्कृतिक व ऐतिहासिक सहल इत्यादी भौतिक सुविधा मोफत उपलब्ध करुन दिल्या जातात.

तसेच दरवर्षी दोन जुन्या शाळा पडुन नव्याने (आर.सी.सी.) सिमेंट कॉंक्रेटच्या इमारती (शाळा) सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत बांधल्या जातात व काही जुन्या शाळांची दुरुस्ती केली जाते. त्यासाठी अंदाजे रु. २ कोटी खर्च होतो.

महानगरपालिकेने सन २००९-१० या वर्षात शिक्षण मंडळ खर्चासाठी एकूण रु. ६ कोटी ६३ लाख रुपयांची तरतुद केलेली आहे.

सन २००९-१० या वर्षात विशेष शिक्षण करामार्फत रु. १ कोटी ७० लाख रुपये उत्पन्नाचा अंदाज अर्थसंकल्पात दाखविण्यांत आला आहे. तसेच इमारत भाडयापोटी शासनाकडुन सन १९९४ ते सन १९९८ पर्यंतचे ५०% प्रमाणे रु. ८७,९१,३८०/- प्राप्त झाले आहेत. व शासनाकडुन त्यानंतरचे रु. ४,७४,७३,४५२/- शाळागृह भाडे येणे बाकी आहे.

उत्पन्नाचे तुलनेत खर्च फारच अधिक असल्याने विशेष शिक्षण करात १% वरुन ३% पर्यत वाढ केल्यास महानगरपालिकेची तुट भरुन निघण्यास काही प्रमाणात मदत होणार आहे. तरी मनपा शिक्षण करात १% ऐवजी ३% वाढ करणेस मंजुरीस शिफारस असे.

**मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने**

उप-आयुक्त (मु.)
मिरा-भाईदर महानगरपालिका

(७)

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## पाणी पुरवठा विभाग

## मा. स्थायी समिती सभा दि.०२/०२/२०१०.

## ।। गोषवारा ।।

**प्रकरण क्र.१२५:- पाणीपट्टी दरात व नविन जलजोडणी शुल्क व इतर दरात वाढ करणेबाबत.**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात जलजोडण्यांना त्रैमासिक पाणीपट्टी आकारण्यात येते. सदर पाणीपट्टी घरगुती जलजोडण्यांना रु.७/- प्रति हजार लिटर व वाणिज्य जलजोडण्यांना रु.२८/- प्रति हजार लिटर या दराने एप्रिल २००३ पासून आकारण्यात येत आहे. सदर पाणीपट्टी दरात गेल्या सात वर्षांपासून कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही.

जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान अभियानाअंतर्गत (JNNURM) केंद्र शासन, राज्य सरकार व महानगरपालिका यांच्यात करण्यात आलेल्या सामंजस्य करारनाम्यानुसार पाणी पुरवठा दरवाढ करावी लागणार आहे.

महानगरपालिकेस दररोज शहाड-टेमघर (स्टेम) पाणी पुरवठा प्राधिकरणाकडून व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून पाणी पुरवठा होतो. या पाणी पुरवठ्याबाबत स्टेम प्राधिकरणास रु.४,५००/- प्रति द.ल.लि. पाणी देयक अदा करावे लागते. तर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास रु.८,०००/- प्रति. द.ल.लि. या दराने पाणी देयके अदा करावे लागते. सदर पाणी देयक विहीत मुदतीत अदा करणे आवश्यक असते. सदर देयकापोटी प्रदान करावयाची रक्कम व इतर पाणी पुरवठा वितरणाबाबतचा खर्च तसेच रिलायन्स एनर्जी व महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांचेकडील वीज दरात मोठ्या प्रमाणात झालेली दरवाढ या सर्व बाबींचा विचार करता पाणीपट्टी दरवाढ करणे आवश्यक आहे. महानगरपालिकेला आता सरासरी ९८ द.ल.लि. पाणी पुरवठा केला जातो. सदर पाणी पुरवठा सरासरी ३६ ते ४० तासांतून २ ते ३ तास केला जातो. शहराच्या लोकसंख्या वाढीचा वेग आशिया खंडात प्रथम क्रमांकावर आहे. सध्या पुरवठा होत असलेले पाणी ३६ ते ४० तासांनी होत असून आठवड्यातून एक दिवस पाणी बंद झाल्यास तद्नंतर ६० ते ७० तासांनी पुरवठा केला जातो. याचा विचार करता नविन पाणी पुरवठा योजना हाती घेणे आवश्यक आहे. यासाठी केंद्र व राज्य मिळून ५० टक्के निधी व ५० टक्के निधी महानगरपालिकेला उभारावा लागणार असल्याने या भांडवली खर्चाची व्यवस्था आतापासून करावी लागणार आहे. महानगरपालिकेचे उत्पन्न पाहता कर्ज घेण्याची ऐपत संपलेली आहे. तसेच शहरास दररोज पाणी पुरवठा करावयाचा असल्याने दरवाढ करणे क्रमप्राप्त आहे.

एप्रिल २०१० पासून महानगरपालिकेची जकात वसुली बंद होणार आहे. पर्यायाने पुर्वानुभव लक्षात घेता महानगरपालिकेच्या उत्पन्नात फार मोठी घट होण्याची शक्यता आहे.

अशा प्रकारे सद्यस्थिती लक्षात घेता पाणीपट्टी दरात वाढ करणे हाच केवळ एकमेव पर्याय आहे. सबब सध्या सुरु असलेल्या पाणीपट्टी दरात वाढ करून ते घरगुती जलजोडण्यांना रु.२०/- प्रति हजार लिटर व वाणिज्य जलजोडण्यांना रु.८०/- प्रति हजार लिटर इतके करणेस शिफारस आहे.

महानगरपालिका क्षेत्रात नविन जलजोडणीकरीता सध्या आकारण्यात येणारे जलजोडणी शुल्क व इतर शुल्क जून २००२ पासून लागू करण्यात आलेले आहेत. मात्र सदर शुल्कात गेल्या सात वर्षापासून कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही. सहाव्या वेतन आयोगानुसार कर्मचाऱ्यांची पगारवाढ फार मोठ्या प्रमाणात झालेली आहे. यामुळे दुरुस्ती व जलजोडणी खर्चातही वाढ करणे आवश्यक आहे. पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेवरील व इतर योजनेवरील खर्च लक्षात घेता वरील शुल्कात सोबत जोडलेल्या तक्त्यानुसार वाढ करणेस शिफारस आहे.

आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

# नविन नळ जोडणी शुल्क – नविन दर

| अ.क्र. | तपशिल | गावठाण जुने स्वतंत्र घर १/२" | रो हाऊस बंगला/पक्के वैयक्तिक बांधकाम १/२" | कोणत्याही व्यवसायासाठी १/२" | इमारत/व्यवसाय १" | | ग्रुप कने. १/२" | ग्रुप कने. १" |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | इमारत | व्यवसाय | | |
| १ | नविन नळ कने. चार्जेस | ५,०००/- | ३०,०००/- | ३०,०००/- | ५०,०००/- | १,००,०००/- | ६०००/- | १०,०००/- |
| २ | अनामत | ७५०/- | २,०००/- | ४,०००/- | २,५००/- | १०,०००/- | ७५०/- | १२५०/- |
| ३ | बोरिंग | २००/- | १,०००/- | १,५००/- | १,०००/- | २,५००/- | २००/- | ४००/- |

| | | |
|---|---|---|
| ४ | खड्डा दुरूस्ती चार्जेस | १.डांबरी रस्ता = १,१००/- प्रति मिटर<br>२.कॉक्रिट रस्ता = १,०००/- प्रति मिटर |
| ५ | रस्ता क्रॉसिंग | १.डांबरी रस्ता = १,५००/- प्रति मिटर<br>२.सिमेंट कॉक्रिट = १,३००/- प्रति मिटर |

आयुक्त
मिरा-भाईदर महानगरपालिका

प्राप्त दि. २८/७/९०

२८/७/९०

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

**मा. स्थायी समिती सभा दि. ०२/०२/२०१०**

**// गोषवारा //**

**प्रकरण क्र :-** ( १२६ ) रस्ते, चौक, उदयाने व इतर वास्तूना नावे देण्याबाबत.

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील रस्ते, उदयाने, चौक, वास्तूना नावे देण्याबाबत आजपर्यंत खालील ठरावाद्वारे निर्णय घेण्यात आलेले आहेत.

१) मा. स्थायी समिती सभा दि. ०६/१०/२००१ ठराव क्र. २६३

२) मा. महासभा दि. १९/१०/२००५ ठराव क्र. ५२

३) मा. महासभा दि. १२/१०/२००६ ठराव क्र. ६०

४) मा. महासभा दि. ०६/१२/२००६ ठराव क्र. ६९

५) मा. महासभा दि. १९/११/२००८ ठराव क्र. ६३

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसुची "ड" मधील प्रकरण अकरा (२) (१) (अ) अन्वये मा. महासभेस नामकरण प्रस्तावांना मान्यता देण्याचे अधिकार प्राप्त आहेत.

सद्यस्थितीत महानगरपालिकेकडे नामकरणाबाबत खालीलप्रमाणे प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत.

| अ.क्र. | ठिकाण | प्रस्तावित नांव | सुचक |
|---|---|---|---|
| १ | मिरारोड टी.एम.टी. बस स्टॉप चौक | श्री. हर्षदभाई दोशी चौक | श्री. चंद्रकांत मोदी |
| २ | मिरारोड पूनम सागर ते बापा सिताराम गार्डन रस्ता | श्री. हर्षदभाई पूनमचंद्र दोशी मार्ग | मिरा-भाईंदर गुजराती समाज |
| ३ | मिरारोड शांती शॉपिंग सेंटर ते सृष्टीपूल रस्ता | श्री. हर्षदभाई दोशी मार्ग | श्री. ध्रुवकिशोर पाटील |
| ४ | भाईंदर (प) मराठी शाळे शेजारील तोदी उदयोग नगर रस्ता | हंसाबेन मनोहरभाई सोनावाला मार्ग | शिवनेरी मित्र मंडळ |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील कोणताही रस्ता / चौक | मेवाडरत्न भामाशाह स्व. हमेरलालजी धाकड मार्ग / चौक | सिटीएडीटर प्रातःकाल |
| ६ | भाईंदर (प) आरक्षण क्र. १०० मधील उदयान | लोकमान्य बाळ गंगाधर टिळक उदयाने | राज बंजारा |
| ७ | भाईंदर (प) रेल्वे समांतर रस्ता | माहेश्वरी भवन मार्ग | ठाणे जिल्हा माहेश्वरी सभा |
| ८ | मिरा-भाईंदर क्षेत्रातील कोणतेही रस्ते, उदयाने,चौक, आरक्षण | बाजीराव पेशवा – २<br>नानासाहेब पेशवा तात्या टोपे<br>राणी लक्ष्मीबाई | अन्तरराष्ट्रीय सरयूपारीण ब्राम्हण परिषद |
| ९ | हटकेश उदयोग नगर मधील रस्ता व चौक | कै. जुबेरजी पटेल मार्ग व चौक | हटकेश एकता महीला मंडळ |
| १० | मिरारोड शांतीनगर गुरूद्वार समोरील मार्ग | गुरूद्वार मार्ग | श्री. गुरूनानक दरबार |

मा. महासभेने यापूर्वी नामकरण केलेले प्रस्ताव वगळता इतर नामकरण प्रस्ताव मा. स्थायी समिती मार्फत मा. महासभेत अंतिम मान्यतेकरीता शिफारस होण्यास शिफारस आहे.

कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम विभाग

**मा. आयुक्त यांच्या मान्यतेने.**

प्राप्त पत्र. २६/९/९०

२६/९/९०

(१)

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि. ०२/०२/२०१०

## ।। गोषवारा ।।

**प्रकरण क्रमांक ( १२७ ) :- मिरा-भाईंदर महानगरपालिका अग्निशमन दलाकरिता दोन मोठे टाटा १६१३/४८ चेसिसवर फायर टेंडर बॉडी बांधणेबाबत.**

मिरा-भाईंदर महानगरपालिका अग्निशमन दलाकरिता वॉटर टेंडर बॉडी बांधणेकामी खरेदी करण्यात आलेल्या दोन मोठया टाटा १६१३/४८ चेसिसवर बॉडी बांधणेबाबतची जाहिर निविदा सूचना **दि. ०४-०७-२००९** रोजी देण्यात आली. त्यानुसार प्राप्त झालेल्या **मे. हाय-टेक सर्व्हिसेस, मे. वाडीया बॉडी बिल्डर्स** व **"मे. देवी फायर सर्व्हिसेस"** ह्यांच्या निविदा दिनांक २०/०७/२००९ रोजी उघडण्यात आल्या. सदर निविदाधारकांनी निविदेसोबत अनुभवाच्या कागदपत्रांची पुर्तता न केल्याने सदरच्या निविदा **मिभा/मनपा/अग्नि/१९३/२००९-१० दिनांक १७-०८-२००९** अन्वये रद्द करुन फेर निविदा मागविणेकरिता **दिनांक २५/०८/२००९** रोजी दिलेल्या **"नवभारत टाईम्स" व "वृत्तमानस"** या वृत्तपत्रात प्रसिध्द केलेल्या जाहिर फेर निविदा सुचनेनुसार **"मे. देवी फायर सर्व्हिसेस", "मे. कुवरजी देवशी आणि कंपनी प्रा. लि.", "मे. वाडीया बॉडी बिल्डर्स"** व **"मे. एलार स्टील इंडस्ट्रिज"** या निविदाधारकांच्या निविदा प्राप्त झाल्या. सदरच्या निविदा **दिनांक १०/०९/२००९** रोजी मा. उपायुक्त सो. (अग्निशमन), मा. मुख्य लेखापरिक्षक सो., मा. मुख्य लेखाधिकारी सो., व मा. नगरसचिव सो., तसेच निविदाकार प्रतिनिधी मे. देवी फायर सर्व्हिसेस, मे. कुवरजी देवशी आणि कंपनी प्रा. लि. व मे. वाडीया बॉडी बिल्डर्स ह्यांच्या समक्ष उघडण्यात आल्या असता, **"मे. एलार स्टील इंडस्ट्रिज"** हे अनुभवाच्या अटीत पात्र ठरत नसल्याने **त्यांचा क्र. २** चा लिफाफा (दरपत्रक) उघडण्यात आले नाही. उर्वरित ३ निविदाधारकांच्या निविदा उघडल्या आल्या असता, त्यांनी अग्निशमन दलाच्या दोन वॉटर टेंडर बॉडी बांधणीसह पुरविण्यात येणा-या अतिरिक्त साहित्याकरिता पुढीलप्रमाणे दर सादर केले आहेत.

| तपशील | मे. देवी फायर सर्व्हिसेस | मे. कुवरजी देवशी आणि कंपनी प्रा. लि. | मे. वाडीया बॉडी बिल्डर्स |
|---|---|---|---|
| वॉटर टेंडर १ नग | २७,९०,०००/- | २९,४०,०००/- | ३५,९९,४५१/- |
| फायर सूट वीथ ॲसेसरीज ५ नग | ३,५१,७३५/- | ५,२६,५००/- | ३,८४,४५०/- |
| 5 k v पेट्रोल जनरेटर १ नग | १,९५,०००/- | १,२०,०००/- | १,८४,१२८/- |
| 1600 LPM पोर्ट्रेबल पंप (पेट्रोल ड्रिव्हन) १ नग | ३,६५,०००/- | ४,५०,०००/- | ३,९९,०००/- |
| 5 H P सबमर्सीबल पंप ( ३ फेज कनेक्शन) १ नग | २२,०००/- | ३९,०००/- | २३,२७७/- |
| इलेक्ट्रिक चैन सॉ कटर १ नग | २४,०००/- | ३०,०००/- | ३६,२९८/- |
| ॲक्रॉन वॉटर / फोम मॉनीटर १ नग | २,५०,०००/- | ३,००,०००/- | १,८०,०००/- |
| **एकुण** | ३९,१७,७३५/- | ४४,०५,५००/- | ४८,०६,६०४/- |

(कृ.मा.प.)

वरीलपैकी मे. देवी फायर सर्व्हिसेस ह्यांचे दर कमी आहेत. परंतु ह्यापुर्वी त्यांना बॉडी बांधणेकामी देण्यात आलेल्या रेस्क्यु वाहनाचे काम त्यांनी दिलेल्या मुदतीपेक्षा १ वर्ष उशिराने पुर्ण करुन सदरचे वाहन महानगरपालिकेच्या ताब्यात दिले होते. त्यामुळे मुख्यलेखा परिक्षक ह्यांनी द्वितीय क्रमांकाच्या निविदाधारकास वाटाघाटीस बोलविण्याचे सुचविले होते. त्याअनुषंगाने निविदाधारक मे. कुवरजी देवशी अॅन्ड कंपनी प्रा. लि. व मा. आयुक्त सो ह्यांच्या आदेशानुसार मे. देवी फायर सर्व्हिसेस ह्यांना अनुक्रमे दिनांक ३०/१०/२००९ व दिनांक ३१/१०/२००९ रोजी वाटाघटीस बोलविण्यात आले होते.

मे. कुवरजी देवशी आणि कंपनी ह्यांचेसह दिनांक ३०/१०/२००९ रोजी झालेल्या चर्चेनुसार त्यांनी दिनांक ०३/११/२००९ रोजीच्या त्यांचे पत्रानुसार प्रती टेंडर रुपये ४०,०००/- एवढे दर कमी करुन एक वॉटर टेंडर बांधणीचे दर रुपये २९,००,०००/- एवढे प्रस्तावित केले आहे.

मे. देवी फायर सर्व्हिसेस, ह्यांचेसह दिनांक ३१/१०/२००९ रोजी झालेल्या चर्चेनुसार त्यांनी दिनांक ३१/१०/२००९ रोजीच्या त्यांचे पत्रानुसार प्रती टेंडर रुपये १०,०००/- एवढा दर कमी करुन एक वॉटर टेंडर बांधणीचे दर रुपये २७,८०,०००/- एवढे होत आहेत.

त्यानुसार उपरोक्त वाटाघाटीनुसार मे. देवी फायर सर्व्हिसेस व मे. कुवरजी देवशी अॅन्ड कंपनी प्रा. लि. ह्यांनी सादर केलेले दर पुढीलप्रमाणे :

| तपशील | मे. देवी फायर सर्व्हिसेस | मे. कुवरजी देवशी आणि कंपनी प्रा. लि. |
|---|---|---|
| वॉटर टेंडर १ नग | २७,८०,०००/- | २९,००,०००/- |
| फायर सूट वीथ अॅसेसरीज ५ नग | ३,५१,७३५/- | ५,२६,५००/- |
| 5 k v पेट्रोल जनरेटर १ नग | १,१५,०००/- | १,२०,०००/- |
| 1600 LPM पोर्ट्रेबल पंप (पेट्रोल ड्रिव्हन) १ नग | ३,६५,०००/- | ४,५०,०००/- |
| 5 H P सबमर्सीबल पंप (३ फेज कनेक्शन) १ नग | २२,०००/- | ३९,०००/- |
| इलेक्ट्रिक चैन सॉ कटर १ नग | २४,०००/- | ३०,०००/- |
| अॅक्रॉन वॉटर / फोम मॉनीटर १ नग | २,५०,०००/- | ३,००,०००/- |
| **एकुण** | **३९,०७,७३५/-** | **४३,६५,५००/-** |

वरील तक्त्यानुसार अग्निशमन दलाकरिता दोन वॉटर टेंडर व अतिरिक्त साहित्याकरिता मे. देवी फायर सर्व्हिसेस ह्यांचे एकुण दर **रुपये ३९,०७,७३५ X २ = रुपये ७८,१५,४७०/-** व मे. कुवरजी देवशी आणि कंपनी प्रा. लि. ह्यांचे एकुण दर **रुपये ४३,६५,५०० X २ = रुपये ८७,३१,०००/-** एवढे आहेत.

उपरोक्त तीनही निविदा पाहता, मे. देवी फायर सर्व्हिसेसे ह्यांची निविदा कमी दराची आहे. परंतु ह्यापुर्वी मे. देवी फायर सर्व्हिसेस ह्यांनी महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाचे रेस्क्यु वाहन १ वर्ष उशिराने महापालिकेस बांधुन पुरविले आहे. तसेच मे. कुवरजी देवशी आणि कंपनी प्रा. लि. ह्यांचे दर मे. देवी फायर सर्व्हिसेसे ह्यांचे दरापेक्षा रु. ४,५७,७६५/- ने अधिक आहेत. सदर बाबत निर्णय घेवुन मे. देवी फायर सर्व्हिसेस व मे. कुवरजी देवशी आणि कंपनी प्रा. लि. ह्यापैकी एक निविदा स्विकारणेस मा. स्थायी समिती सभेस निर्णय घेण्यास शिफारस असे.

उप-आयुक्त
**अग्निशमन व आणीबाणी सेवा**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईदर महानगरपालिका

## मा.स्थायी समिती सभा दि. ०२/०२/२०१०

### // गोषवारा //

**प्रकरण :-९२८ कापडी फलक,बॅनर्स,कटाउट,होर्डिंग्ज व कमानीच्या जाहिरात फी दरामध्ये वाढ करणेबाबत.**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २४४, २४५,३८६ आणि ३९२ अन्वये आणि मुंबई प्रांतिक महानगरपालिका (जाहिरात व फलक नियंत्रण) नियम २००३ अन्वये जाहिरात व आकाशचिन्हे इत्यादीवर नियंत्रण करण्याची तरतूद आहे. त्यानुसार मा.स्थायी समिती सभा दि.२९/०२/२००८ ठराव क्र.४३ अन्वये मिरा भाईदर महापालिका क्षेत्रातील जाहिरातीबाबत व सुधारीत जाहिरात फी दरपत्रकाच्या प्रस्तावास मा.महासभा दि.१९/०३/२००८ ठराव क्र.३५ अन्वये दि.०१/०४/२००८ पासून सुधारीत जाहिरात फी दरपत्रकास मान्यता मिळाली आहे. सदर ठरावातील दरपत्रकाप्रमाणे सन २००८ मध्ये १३० होर्डिंग्जकरीता निविदा मागविल्य असता १०X२० चौ.फुटाच्या (२०० चौ.फुट) होर्डिंग्जकरीता प्रति होर्डिंग्ज मासिक दर रु.४००१/- प्राप्त झाला आहे. तसेच माहे डिसेंबर २००९ मध्येही दुस-या टप्प्यातील ९० होर्डिंग्जकरीता प्रति होर्डिंग्ज रु.४००१/- मासिक दराचा प्रस्ताव प्राप्त झाला आहे. व त्यास मा.स्थायी समिती सभा दि.१७/१२/२००९ ठराव क्र.७८ नुसार मंजुरी मिळालेली आहे. निविदेमध्ये प्राप्त दरानुसार होर्डिंगजकरीता मासिक दर प्रति चौ.फुटास दर रु.२०/- इतका आहे. त्या तुलनेमध्ये मा.महासभा दि. १९/०३/२००८ ठराव क्र. ३५ नुसार नविन सुधारीत जाहिरात दरपत्रकामधील अनुक्रमांक (२.) कापडी फलक (बॅनर्स) /कटाउट व अ.क्र. (९.) होर्डिंग्ज (आकाशचिन्ह)/कमानी केलेले दर कमी आहेत.

महानगरपालिकेस जाहिरातीमधून मिळणा-या उत्पन्नात वाढ होण्याच्या दृष्टीने मा.महासभा दि. १९/०३/२००८ ठराव क्र. ३५ नुसार मंजुर केलेल्या जाहिरात दरपत्रकातील अनुक्रमांक (२.) कापडी फलक (बॅनर्स) /कटाउट (९.) होर्डिंग्ज (आकाशचिन्ह)/कमानी इत्यादीकरीताच्या प्रति चौ.फुटातील दरात वाढ करणे योग्य होईल. याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे.

**जाहिरात करीता माहे १ एप्रिल २००८ पासून लागू असलेले दर व नविन प्रस्तावित दर**

| माहे १ एप्रिल २००८ पासून लागू असलेले दर | | | | | नविन प्रस्तावित दर | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | जाहिरातीचे प्रकार | मोजमाप | जाहिरातींचे दर | | प्रति १ चौ.फुट प्रति महिना | वार्षिक रुपये |
| | | | मासिक रुपये (प्रति चौ.फुटास) | वार्षिक रुपये | | |
| २ | कापडी फलक (बॅनर्स)/कटाउट | १० चौ.फुटापर्यत<br>१० चौ.फुटावरील | रु.५/-<br>रु.३/- | रु.६०/-<br>रु.३६/- | रु.१०/- | रु.१२०/- |
| ९ | होर्डिंग्ज (आकाशचिन्ह)/कमानी (मोठे जाहिरात फलक) | २०० चौ.फुटापर्यत<br>२०० ते ३०० चौ.फुट<br>३०० चौ .फुटावरील | रु.४/-<br>रु.३/-<br>रु.२.५/- | रु.४८/-<br>रु.३६/-<br>रु.३०/- | रु.१० | रु.१२०/- |

P.T.O

**टिप :-**

१) सदर जाहिरातींचे दर क दर्जाच्या रस्त्यासाठी आहेत. ब व अ दर्जाच्या रस्त्यासाठी या दरावर अनुक्रमे ५०% व १००% अतिरिक्त फी आकारण्यात येईल.

२) वरील जाहिरात फी दर हे फक्त अप्रकाशित जाहिरात फलकासाठी असून प्रकाशित जाहिरात फलकासाठी एकूण फी च्या २०% जादा फी आकारण्यात येईल.

३) फक्त खाजगी जागेतील होर्डिंग्ज यांना जाहिरात फी च्या ३०% कमी दराने जाहिरात फी आकारण्यात येईल.

४) राजकीय,सामाजिक तसेच धार्मिक जाहिरातीकरीता जाहिरात दरामध्ये २०% कमी दराने जाहिरात फी आकारण्यात येईल. तथापि सदरची परवानगी दहा दिवसापेक्षा जास्त कालावधीसाठी देण्यात येणार नाही

५) खाजगी होर्डिंग्जकरीता पक्षकारकडून जाहिरात फलकाच्या २०% रक्कम अनामत म्हणून घेण्यात यावी.

६) तात्पुरत्या परवानगी करीता पक्षकाराकडून एकुण जाहिरात फी च्या दुप्पट अनामत रक्कम भरून घेतली जावी. पक्षकाराने परवानगी दिलेला कालावधी संपल्यानंतर त्वरीत फलक काढले नाहीत तर अनामत रक्कम जप्त करण्यात यावी.

तरी महानगरपालिकेस जाहिरातीमधून मिळणा-या उत्पन्नात वाढ होण्याच्या दृष्टीने मा.महासभा दि. १९/०३/२००८ ठराव क्र. ३५ नुसार मंजुर केलेल्या जाहिरात दरपत्रकातील अनुक्रमांक (२.) कापडी फलक (बॅनर्स) /कटाउट (९.) होर्डिंग्ज (आकाशचिन्ह)/कमानी इ.मध्ये फीमध्ये प्रस्तावाप्रमाणे टिपांसह दरवाढीकरीता मा.स्थायी समितीस मान्यतेस शिफारस असे.

**मा.आयुक्त सो.,यांच्या मान्यतेने.**

उपआयुक्त (जाहिरात)
मिरा भाईंदर महानगरपालिका

D/Drives/Backup/Kavita/Sadar Report Letter.

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि.०२/०२/२०१०

## // गोषवारा //

**प्रकरण क्र.** १२९

**विषय :-** **केंद्र शासनाच्या जवाहरलाल नेहरु नॅशनल अर्बन रिन्युअल मिशन (J.N.N.U.R.M) अंतर्गत विशेष स्वच्छता कर वसुल करणेबाबत.**

केंद्र शासनाच्या जवाहरलाल नेहरु नॅशनल अर्बन रिन्युअल मिशन (J.N.N.U.R.M) अंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिकेने रु. १९०० कोटीचे प्रकल्प सादर केलेले आहेत जवाहरलाल नेहरु नॅशनल अर्बन रिन्युअल मिशन अंतर्गत मेमोरॅंडम ऑफ़ अंडरस्टॅंडिंग (M.O.U.) अंतर्गत उत्पनाचे स्त्रोत वाढविण्याची हमी महापालिकेने दिलेली आहे.

मिरा भाईंदर महापालिका क्षेत्रात दररोज ३८० ते ४०० मैट्रीक टन घनकच-याची निर्मिती होत आहे. दैनदिन निर्माण होणारा घनकचरा थेट पध्दतीने बंदिस्त घंटा गाडीत गोळा करुन प्रकल्प ठिकाणी प्रक्रियेकरिता पाठविला जात आहे.

महापालिकेतर्फ़े घनकचरा व्यवस्थापना अंतर्गत कंत्राट पध्दतीने प्रभागनिहाय साफ़सफ़ाई करणेकामी अंदाजे रु. २२ कोटी खर्च येत आहे. घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत महापालिकेतर्फ़े नागरिकांना व व्यावसायिकांना देण्यात येणा-या सेवेच्या बदल्यात काही प्रमाणात कर नागरिकाकडून वसूल करणे अपेक्षित आहे.

महापालिकेतर्फ़े वसुल करण्यात येणारा जकात वसुली कर हा माहे एप्रिल २०१० पासून बंद होणार आहे. महापालिकेच्या उत्पान्नाचे मुख्य स्त्रोत असलेला जकात कर रद्द करुन स्थानिक संस्था कर लागू करण्याचे निर्देश राज्य शासनाने दिले आहे. जकात कर बंद करुन उपकर लागू केल्याबाबतच्या १ सप्टेंबर २००८ ते १८ डिसेंबर २००८ या कालावधीत अनुभव पाहता जकातीच्या ५०% एवढेच उत्पन्न महानगरपालिकेस मिळालेले आहे. अशा परिस्थितीत जकात कर बंद करुन स्थानिक संस्था कर लागू केल्यानंतर महानगरपालिकेच्या उत्पन्नाची घट होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ११ कलम १२९ ब अन्वये विशेष स्वच्छता कर लागू करण्याची तरतुद आहे. प्रस्तावित कर खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र | इमारत प्रकार | वापराचा प्रकार | प्रस्तावित कर |
|---|---|---|---|
| १ | निवासी मालमत्ता | बैठी घरे, इमारती, | रेटेबल व्हॅल्युच्या ४% |
| २ | बिगर निवासी | हॉटेल्स, खानावळी, मटन चिकन शॉप, रेस्टॉरंन्ट, मिठईची दुकाने, आईसक्रिम पार्लर, फ़ास्टफ़ुड विक्री दुकाने, चायनिज सेन्टर, | रेटेबल व्हॅल्युच्या ७% |
| ३ | बिगर निवासी (जादा प्रमाणात निर्माण होणारा घनकचरा) | मल्टीप्लेक्स, शॉपिंग सेन्टर, तबेले, मॉल, कॉल सेन्टर, मंगल कार्यालये, बफ़ींग उद्योग धंदे, रिसॉर्ट, क्लब, बार | रेटेबल व्हॅल्युच्या १०% |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ११ कलम १२९ ब अन्वये विशेष स्वच्छता कर लागू करणेचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या मंजूरीस सादर.

**उपायुक्त (मु)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. आयुक्त सो, यांच्या मान्यतेने**

F:\SADAR\GHANKACHRA SHULKA 25-01-10.doc

# मिरा भाईदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि.०२/०२/२०१०

## //गोषवारा //

**प्रकरण क्र१३०:- राज्य शासनाच्या धोरणानुसार दि.०१/०४/२०१० रोजी पासून जकात करापेवजी स्थानिक संस्था कर लागू करणे बाबत विचार विनिमय करणे.**

राज्य शासनाने ऑगस्ट २००९ मध्ये राज्यातील "ड" वर्ग महानगरपालिकांच्या हद्दीत येणाऱ्या मालांवर जकाती ऐवजी स्थानिक संस्था कर लागू करण्याबाबतचा तत्वतः निर्णय घेतलेला होता.व त्या अनुषंगाने महानगरपालिकेच्या हद्दीत येणाऱ्या मालांवर जकातीऐवजी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये सुधारणा करण्यासंबंधीचा अध्यादेश दि. ३१ ऑगस्ट, २००९ रोजी राजपत्रात प्रख्यापित करण्यात आला. या अधिनियमांचे कायद्यात रूपांतर करण्यासाठी २००९ च्या नागपुर हिंवाळी अधिवेशनात सादर करण्यात आलेल्या विधेयकास विधी मंडळाने मान्यता दिली आहे. तद्नंतर नगर विकास विभागाचे सचिव- (२) मा.श्री.मनूकुमार श्रीवास्तव,यांचे अध्यक्षतेखाली दि.३०/१२/०९ रोजी सर्व "ड" वर्ग महानगरपालिकेचे मा.आयुक्त व मा.महापौर यांची बैठक मंत्रालय येथे बोलविण्यांत आली होती. या बैठकीत सर्व सन्माननीय महापौर यांनी जकात कर रद्द करणेस विरोध दर्शविला व स्थानिक संस्था कराच्या अंमलबजावणी बाबत अडचणी मांडल्या. परंतु शासनाने जकात कर रद्द करुन स्थानिक संस्था कर लागू करण्याचा ठाम निर्णय घेतला.त्यानुसार "मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९" चे कलम १२७ च्या उपकलम (२) च्या खंड (क क क) अन्वये "ड" वर्ग १६ महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये दि. ०१/४/२०१० पासून जकातीऐवजी स्थानिक संस्था कर लागू करण्याची अधिसूचना राजपत्रात दि. ०१/०१/२०१० रोजी प्रख्यापित केलेली आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) नियम २०१० तयार करण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरु असून, ती अद्याप प्रसिध्द झालेली नाही.

स्थानिक संस्था कर हा लेखाधारीत कर असून, महानगरपालिका हद्दीमध्ये उपभोग, उपयोग किंवा विक्री यासाठी शहराच्या हद्दीमध्ये आयात होणाऱ्या मालाच्या प्रवेशावर लागू करावयाचा आहे. महाराष्ट्र मुल्यवर्धित कर अधिनियम २००२ च्या तरतुदी अन्वये वार्षिक पाच लाखापेक्षा जास्त उलाढाल असलेल्या व्यापाऱ्यांना स्थानिक संस्था कर भरण्यासाठी नोंदणीकृत व्यापारी म्हणून मान्यता द्यावयाची आहे. दि. ०१/४/२०१० पुर्वी स्थानिक संस्था कर अंतर्गत व्यापाऱ्यांची नोंदणी करून घ्यावयाची आहे. तसेच महानगरपालिकेचा अधिकारी कर्मचारी वर्गास शासनाकडून स्थानिक संस्था कराचे प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात येणार आहे.

यापूर्वी उपकर वसुली करीता विभागवार २० पथके तयार करण्यात आली होती. त्याप्रमाणे विभागवार २० पथके तयार करून त्यामध्ये प्रत्येक पथकात १ उपकर अधिकारी, १ उपकर निरीक्षक, १ लिपीक, १ संगणक चालक, १ शिपाई नेमणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे आवश्यकतेनुसार भरारी पथके नेमावी लागतील. सदरहू कर्मचारी /अधिकारी वर्गास त्यांच्या मुळ विभागात नेमून दिलेले दैंनदिन कामकांज सांभाळून अर्ध वेळ स्थानिक संस्था कराचे कामकांज करावे लागणार आहे. यापूर्वी उपकराचे मध्ययवर्ती कार्यालय टेंबा रोड, मॅक्सेस मॉल जवळ,भाईंदर (पश्चिम) येथे कार्यान्वित केले होते. सदरहु इमारती मध्ये तळ मजल्यावर स्थानिक संस्था कराचे मध्यवर्ती कार्यालय सुरू करावयाचे आहे.

शासनाच्या नगरविकास विभागाचे सह सचिव मा.श्री.म.दि.अडिवरेकर यांच्या दालनांत दि.१६/०१/२०१० रोजी झालेल्या बैठकीत स्थानिक संस्था कराची प्रस्तावीत दरसुची ही बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जकात कराची अनुसूची "एच" प्रमाणे बनविण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. तसेच स्थानिक संस्था कराच्या दराचे वर्गीकरण हे (१)जकात कर माफ (२)१/२ %, (३)१ % (४) २ % (५) ५ % व (६) महागडया वा लक्झरी मालावर ७ % कराचे दर असावेत, अशा सूचना शासनाने दिलेल्या आहेत. त्याअनुषंगे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जकात कराची अनुसूची "एच" मधील कराच्या दरात आवश्यक ते बदल करुन प्रस्तावित स्थानिक संस्था कराची दरसुची शासनाकडे पाठविण्यात आलेली आहे. शासनाच्या दि.३१/०८/२००९ रोजी प्रसिध्द झालेल्या अध्यादेशा मध्ये "मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९" चे कलम ९९ मध्ये सुधारणा केली असून, कलम ९९ (ख) प्रमाणे मालाच्या विविध प्रवर्गासाठी कर ज्या दरांनी व ज्या मर्यादेपर्यंत बसविण्यात येतील, ते दर व ती मर्यादा याबाबत मा.आयुक्त यांचा प्रस्ताव विचारात घेउन फेब्रुवारी महिन्याच्या २० तारखेला किंवा त्यापुर्वी स्थानिक संस्था कराची दरसुची शासन राजपत्रात अधिसूचित करण्याची तरतूद केलेली आहे. त्याअनुषंगे शासनाकडून स्थानिक संस्था कराची दरसूची राजपत्रात येत्या काही दिवसात अधिसूचीत होईल.

चालू वर्षी दि.१९/०२/२००९ ते दि.३१/०३/२०१० या कालावधीत जकात करापासून,जकात अभिकर्ता यांचेकडून मंजुर निविदानूसार रु.८८,५९,२५,४७६/- एवढे उत्पन्न प्राप्त होणार आहे. मागील वर्षी दि.०१/०९/२००९ ते दि.१८/१२/२००९ या कालावधीत जकात कराऐवजी लेखाआधारीत उपकर लागू करण्यांत आलेला होता. परंतू शहरातील बहूतांशी व्यापारी हे लेखे ठेवत नसल्याने उपकराची परिगणना करणे अडचणीचे झालेले होते.परिणामी उपकर पासून उत्पन्नात वाढत चाललेली तूट पाहता, मा.महासभा ठराव क्र.८० दि.१७/१२/२००८ अन्वये उपकर पध्दत रद्द करून पुन्हा जकात कर लागू करणेचा निर्णय घेतलेला होता. उपकरापोटी ५६%

उत्पन्न प्राप्त झालेले आहे. शासनाच्या दि.३१/०८/२००९ रोजीच्या अध्यादेशामध्ये महानगरपालिका हद्दीमधील स्थावर मालमत्तांच्या विवक्षित हस्तांतरणावरील अतिरिक्त मुद्रांक शुल्क १% दराने आकारुन महानगरपालिकेस उत्पन्न प्राप्त करुन देण्याची तरतूद आहे.

वरीलप्रमाणे एकंदरीत परिस्थिती पाहता लेखाआधारीत स्थानिक संस्था करापासून जकात करा ऐवढे उत्पन्न प्राप्त होण्याची संभावना नाही. तरी याप्रमाणे शासनाच्या आदेशानुसार स्थानिक संस्था कर दि.०१/०४/२०१० रोजीपासून लागू करण्याची कार्यवाही सुरू असल्याबाबतचा अहवाल सभेपुढे सादर करण्यांत येत आहे.

उप-आयुक्त (मु.)
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा.आयुक्त यांच्या मान्यतेने**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि.०२/०२/२०१०

## ।। गोषवारा ।।

**प्रकरण क्रमांक (१३१) :- सन २०१०-११ चा अर्थसंकल्पात अग्निशमन करात दरवाढ करणे बाबत.**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम कलम १२९ (सी), १२७(१), ६३(५) नुसार अग्निशमन सेवाकर हा मालमत्ता कराच्या करयोग्य मुल्यावर कमाल २ % प्रमाणे घेता येतो. सध्या माहनगरपालिका १ % प्रमाणे घेत आहे. सदरचा कर २ % एवढा वाढविल्यास अग्निशमन दलाकडील उत्पन्नात दुप्पटीने भरपडून भविष्यात अग्निशमन दलास लागणारे मनुष्यबळ व अत्याधुनिक साधनसामुग्री उपलब्ध करणे सोयीचे होईल तसेच **महाराष्ट्र आग प्रतिबंधक आणि जीवरंक्षक उपाय योजना अधिनियम – २००६,** नुसार अग्निशमन दलाकडुन जमा करण्यात येणारा महसुल "आग सुरक्षा निधी" या स्वतंत्र बँक खात्यात जमा करून तो अग्निशमन विभागाकरीता राखीव ठेवायचा आहे.

तरी सध्या आकारण्यात येणाऱ्या अग्निशमन कर १ % ऐवजी २ % एवढा दरवाढीच्या प्रस्तावास मा. स्थायी समिती मान्यतेस शिफारस आहे.

उप आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

साक्ष दि. २८/४/१०

[signature]

२८/१/१०

पृ. १२.४५ ११.

॥ के सन्दर्भे प्रस्ताव ॥

प्रकरण क्र. ४32

गोपनीय नाहि.